जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७०० दिनांक -१६/०९/२०२३**

येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर

## दरोडयाच्या गुन्हयाचा दोन तासात छडा ५ आरोपीच्या आवळल्या मुसक्या

दि.१४/०९/२०२३ रोजी फिर्यादी नामे मुकेश सपकाळ हे त्यांचे मित्रासह चिमाघाट येरवडा येथे ब्रिजखाली बसले असता तेथे अनोळखी चार ते पाच इसमांनी फिर्यादीवर धारदार शस्त्राने वार करुन खिशातील ९०,०००/- रु काढून घेवून गेले आहेत म्हणून येरवडा पो.स्टे.गु.र.नं.६३३/२०२३ भादवि ३९४, ३९५,३९७,१२० (ब),३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकाचे **पोलीस अंमलदार राहुल परदेशी, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे** यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हे येरवडा भागात येणार आहेत. सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती वरुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी पोलीस उप निरीक्षक अंकुश डोंबाळे व अंमलदार यांनी तेथे जावून संशयीत इसमांना पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले. त्यास त्यांचे नाव पत्ता विचारता **१. आकाश हनुमंत भंडारी उर्फ दशरथ वय २३ वर्षे रा वडारवस्ती येरवडा पुणे २. अनुज सोमनाथ जोगदंड वय १९ वर्षे रा ताडीगुत्ता येरवडा पुणे ३. योगेश दिलीप नवघणे वय ३० वर्षे रा गोकुळनगर कोढवा पुणे ४. सलमान फारुख कुरेशी वय २३ वर्षे रा शनी अळी येरवडा पुणे ५. शिवकुमार संजय शेलार वय २२ रा भाजी मंडई येरवडा** पुणे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे चौकशी करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. सदर आरोपीस दि. १५/०९/२०२३ व दि. १६/०९/२०२३ रोजी अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पर्णकुटी चौकीचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक महेश लामखेडे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४,श्री शशिकांत बोराटे मा.सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग,श्री संजय पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन श्री. बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक गुन्हे येरवडा श्रीमती कांचन जाधव,श्री. जयदिप गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, पोउपनि प्रदिप सुर्वे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे, दत्ता शिंदे, तुषार खराडे, पोना किरण घुटे, अमजद शेख, सागर जगदाळे, कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे अनिल शिंदे, राहुल परदेशी, सुरज ओंबासे, दत्तात्रय शिंदे, प्रशांत कांबळे, सुशांत भोसले, अजित वाघुले यांनी केलेली आहे.